तार : 'EDUTECH'

दूरध्वनी : २६२०६०१-०२
२६२१७२६
२६२०००७

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

क्रमांक : २/एन्जीसी/१०९०/२१६९८

दिनांक : 27 JUL 1990

प्रति,

अध्यक्ष
लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था,
नागपूर.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

महोदय,

शासनाच्या दिनांक २५ जुलै, १९९० च्या शिक्षण व सेवायोजन विभागाच्या पत्र क्रमांक : पीईसी/१०९०/५७००२/[४११६]/तांशि-१-अ, दिनांक २५-७-१९९०, आपणास उद्देशून लिहिलेले व या कार्यालयाला पृष्ठांकित केलेल्या पत्राप्रमाणे आपल्या संस्थेस १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर खाली नमूद केलेले पदवी अभ्यासक्र सुरु करण्यास खालील अटींवर व शर्तींवर परवानगी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० प्रवेश क्षमता. |
| २. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० प्रवेश क्षमता. |
| ३. | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० प्रवेश क्षमता. |

[१] ही मान्यता तात्पुरत्या स्वरुपात अखील भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अंतिम मान्यतेच्या अधीन राहून असेल.

२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टीईएम/३३८२/१११८३६/१९ तांशि-१-अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासना विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास मान्य कराव्या लागतील. [सदर शासन निर्णया प्रत सोबत जोडली आहे].

३. आपल्या संस्थेने रुपये $ 30,00,000/-[रुपये तीस लाख फक्त] संस्थेचे अध्यक्ष व संचाल तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात राष्ट्रीय कृत बँकेत नियत ठेव त्वरीत ठेवण्यात यावी.

..... २/-

४. शासनाने, संचालक व अखील भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या प्रमाणके व मानकाप्रमाणे आवश्यक त्या इमारती, साधनसामुग्री, प्रशिक्षित शिक्षक वर्ग व इतर शैक्षणिक सुविधांची तरतूद संस्थेने करणे आवश्यक आहे.

५. संस्थेची कमाल प्रवेश क्षमता १८० एवढी राहिल व ती वरील तीन अभ्यासक्रमाकरिता सिमित राहिल.

६. शासनाने विहित केलेल्या प्रवेश नियमानुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

७. अभ्यासक्रमाचे शुल्क रूपये ८,५००/- व इतर प्रमाणित शुल्क इतके प्रतिवर्षी आकारण्यात यावे.

तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण त्वरीत या कार्यालयाशी संपर्क साधावा. आपणास असेही सूचित करण्यात येते की, संबंधित विद्यापिठाने सेवी स्वरूपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आपण प्रत्यक्षात अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करू नये व अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

आपला विश्वासू,

[signature]

[भा.बा. चोपणे]
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

डीएलपी/२७-७